Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 581 – 583
DOI: 10.5281/zenodo.10258861

Original Research Article

# महात्मा गांधींजी : स्वच्छ भारत, स्वस्थ भारत व समृद्ध भारत एक अभ्यास

प्रा. डॉ. राजेश्वर खाकरे

विभाग प्रमुख, भूगोल विभाग, जय क्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर ४१३५३२ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: rdkhakre@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

भारतीय लोकांना लाभलेले गांधी एक चालते बोलते विद्यापीठ होते, त्यांचे विचार आज आत्मसात करण्याची खूप गरज आहे. इ.स.१८६९ ऑक्टोबर २ तारखेला पोरबंदर येथे जन्म झाला, शिक्षण राजकोट येथे झाले, वयाच्या १३ व्या वर्षी विवाह झाला. पत्नीचे नाव कस्तुरबा गांधी होते. गांधीजी चे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर इंग्रज दडपशाही शासनाच्या विरोधात स्वातंत्र्य आंदोलनामध्ये सहभाग घेतला, असहकार चळवळ, सविनय कायदेभंग चळवळ आणि भारत छोडो आंदोलनाच्या माध्यमातून देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. म्हणूनच त्यांना सुभाष चंद्र बोस यांनी 'राष्ट्रपिता' ही पदवी बहाल केली. तसेच रवींद्रनाथ टागोर यांनी त्यांना 'महात्मा'ही पदवी प्रदान केली. यावरून देशाच्या स्वातंत्र्य आंदोलनात त्यांची भूमिका किती बहुमोल होती याची प्रचिती येते. असे हे गांधीजी ज्याने स्वातंत्र्य आंदोलनातच केवळ योगदान दिले नाही तर स्वच्छतेच्या क्षेत्रामध्येही त्यांनी संपूर्ण भारतवासीयांना स्वच्छता आणि आरोग्य या विषयी खूप माहिती दिली आहे. गांधीजी असे म्हणतात की ज्या देशात स्वच्छता व आरोग्य याची काळजी घेतली जाते त्यावेळी तो देश समृद्ध आणि विकसित होत असतो. गांधीजीचे व्यक्तिमत्व, कर्तृत्व पूर्णपणे चारितीर्थावर आधारित आहे, गांधीजींना स्वच्छता ही बालपणापासून व शालेय जीवनापासून खूप आवडीचा विषय राहिलेला होता, त्यामुळे त्यांनी या वयापासूनच स्वतःमध्ये शिस्त लावून घेतली आहे.त्यामुळे गांधी हे कधी फार आजारी पडलेले पाहायला मिळत नाही. इ.स.१८९० मध्ये घेत असलेल्या आहारात बदल करून रोग बरे करणारे " डॉ. ॲलिनसन" यांनी काही आरोग्य विषयी विचार घेण्याचे सले दिले होते, त्यामध्ये स्वच्छता हा विषय खूप महत्त्वाचा होता. तर डॉ. देव यानी साफसफाई ची माहिती देताना आरोग्यासाठी स्वच्छता विषयी खूप महत्त्वाची आहे असे मत मांडले. गावातील रस्ते, अंगनातील कचरा, विहीरीच्या आसपासचे खड्डे भरून काढले, चिखल होणार नाही व त्यातून रोगराई निर्माण होणार नाही याची काळजी घेतली. असं सल्ले त्यावेळी

देण्यात आलेले होते. याचाच अर्थ गांधीजींना त्या काळापासूनच स्वच्छतेविषयी व स्वच्छ राहिल्यानंतर आरोग्य विषयी खूप माहिती होती, त्यामुळे 'स्वच्छ भारत मिशन' हा उपक्रम आज देशभर गांधीजीच्या नावाने चालवला जातो. विकसित राष्ट्रांमध्ये लोकसंख्या कमी असल्यामुळे स्वच्छता आणि आरोग्य याला खूप महत्त्व दिले जाते परंतु भारतासारख्या जास्त लोकसंख्या असलेल्या देशात या गोष्टी त्या काळापासून अमलात आणण्यासाठी सरकारला सूचित करण्याचें काम महात्मा गांधीच्या विचारातून करावे लागते. आज आपण पाहतो सर्व शहरे प्रदूषित होत आहेत सगळीकडे अस्वच्छता पसरलेली आहे यातून निश्चितपणे वेगळ्या आरोग्य विषयक समस्या निर्माण होणार आहे, त्यामुळे गांधीजींनी निर्माण केलेली स्वच्छ भारत सुंदर भारत संकल्पना घराघरापर्यंत व माणसा माणसापर्यंत पोहोचली पाहिजे. तरच आपल्या देशातील सर्व सामान्य लोकांचे आरोग्य चांगले राहील. यासाठी गांधीजींनी दिलेले विचार सर्वांनी स्वीकारले पाहिजे, तरच आपला देश स्वच्छ, सुंदर व समृद्ध होईल व विकसित राष्ट्रांमध्ये आपल्याही देशाचे नाव स्वच्छ भारत म्हणून घेतले जाईल.

**गृहीतके**

१. भारतातील लोकांमध्ये स्वच्छता व आरोग्य या विषयी जनजागृती निर्माण करणे.

२. गांधीजीचे स्वच्छता व  समृद्ध भारत व विकास याकडे सरकारचे लक्ष वेधणे.

**उद्देश**

१. भारतीय लोकांमध्ये स्वच्छता याविषयी माहिती देणे.

२. स्वच्छ भारत सुंदर भारत स्वप्न पूर्ण करणे.

३. भारतीय स्वच्छते विषयी कडक कायदे करून त्याची अंमलबजावणी करणे.

४. अस्वच्छतेमुळे नवनवीन रोगाची निर्मिती होत आहे ,त्यामुळे त्यात अनेक लोकांचा मृत्यू होत आहे ,याकडे लक्ष वेधणे.

५. स्वच्छते विषयी व आरोग्य विषयी गांधी विचार जगाने आत्मसात केलेले आहे हे निदर्शनास आणून देणे.

**विश्लेषण**

वरील मांडलेल्या गांधी विचाराचे विश्लेषण करत असताना मला आज गांधी विचारावर चालत असल्यास टिपा टिपणी व गांधीजींनी त्या काळात मांडलेले आरोग्य व स्वच्छता विषयी विचार मांडण्याचा योग आला यातून गांधी चालते बोलते विचार आजच्या पिढींना कशा पद्धतीने महत्त्वाचे आहे, कारण आरोग्य समस्या असतील, पर्यावरणीय घटक असेल, उपलब्ध असलेले संसाधन असतील, या सर्वांचा मानव आपल्या गरजेनुसार अतिरेक करत आहे त्यातून आज वेगळ्या प्रकारच्या रोगराई व त्यातून मानवाचे होणारे मोठे नुकसान आर्थिक व सामाजिक या सर्व घटकाचा विश्लेषण या शोधातून करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे तरी गांधी विचार आधुनिक काळापासून ते आज एकविसाव्या शतकापर्यंत व पुढेही कायम सर्वसामान्यांच्या उपयोगी येतील या अपेक्षेने मी हा शोध प्रबंध लिहिण्याचा प्रयत्न केलेला आहे. वरील विचाराची येणाऱ्या काळात सर्वसामान्यापर्यंत गांधीजींचे स्वच्छतेचे विचार गेला पाहिजे या उद्देशाने हा शोध निबंध लिहिला आहे.

**संदर्भ सूची**


१. गांधी मो.क. सत्याचे प्रयोग, नवजीवन मुद्रणालय, अहमदाबाद

२. आधुनिक भारताचा इतिहास, अरुणा प्रकाशन १०३, ओमकार कॉम्प्लेक्स- अ, खर्डेकर स्टॉप, औसा रोड, लातूर

३. ग्रोवर, यशपाल, आधुनिक भारत का इतिहास, एस. चंद्र प्रकाशन, दिल्ली

४. तळवलकर गोविंद, नवरोजी ते नेहरू, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई

५. बिपिन चंद्र, आजादी के बाद का भारत (१९४७-२०००) दिल्ली विश्वविद्यालय दिल्ली,२००२

६. शर्मा एल. पी. आधुनिक भारत, लक्ष्मीनारायण अग्रवाल प्रकाशन, आग्रा, २०१०

७. Chandra Bipin, India's Struggle for Independence (1857-1947) Viking Publication New Delhi

८. Rao M.S.A. (Ed.) Social movement in india, manohar publication, New Delhi,1984.